**कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा**
**ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र**
**गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल**

**अंक ८०/२०२०** | **दिनांक ०६/१० /२०२०** | **कालावधी ५दिवस**

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ३० /०९ /२०२० ते ०६ /१० /२०२०) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र, पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०७ /१० /२०२० सकाळी ८:३० पासून ११ /१० /२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०/०९ | ०१/१० | ०२/१० | ०३/१० | ०४/१० | ०५/१० | ०६ /१० | | ०७/१० | ०८/१० | ०९/१० | १०/१० | ११/१० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.०. | ०.० | १.६ | ०.० | पाऊस (मिमी) | १० | ० | ० | ० | १५ |
| | | | | | | | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३३ | ३३ | ३४ | ३३ |
| | | | | | | | किमान तापमान (अं.से) | २६ | २६ | २६ | २६ | २६ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | ८ | ६ | ७ | ५ | ८ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८८ | ८६ | ८० | ७३ | ९३ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ६४ | ५७ | ५४ | ४५ | ५० |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ३ | ३ | ३ | ५ |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा | आ. | ई. पू. | आ. | ई. पू. | आ. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| १.६ | ३०६२.४ | ४२३३.४ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक ११ ऑक्टोबर २०२०, रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच पुढील पाच दिवस तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. विस्तारित श्रेणी अंदाजानुसार दिनांक १६ ते २२ ऑक्टोबर, २०२० दरम्यान कोंकण विभागासाठी पर्जन्यमान हा सरासरी एवढा राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | | • **दिनांक १० ते १३ दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने तयार झालेले भात पिक कापणी व मळणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे.** |
| **भात** | **दाणे भरणे ते काढणी अवस्था** | • पुढील पाचही दिवस पावसाची उघडीप राहून दिनांक ११ ऑक्टोबर २०२०, रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने पावसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या हळव्या भात पिकाची सकाळच्या वेळेस “वैभव” विळयाच्या सहाय्याने जमिनीलगत कापणी करून लगेच मळणी करून साठवणी अगोदर २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे.<br>• गरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी. निमगरवे भात पक्व होवू लागल्यास कापणी पूर्वी ८-१० दिवस भात खाचरातील पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• हळव्या जातीच्या भात पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे पावसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या हळव्या भात पिकाची कापणी उरकून घ्यावी. या किडीच्या अळ्या दिवसा फुटव्यात अथवा जमिनीत लपून राहतात आणि रात्री या किडीच्या अळ्या लोंब्या कुरतडतात, त्यामुळे दाणे जमिनीवर गळतात. किडीच्या नियंत्रणासाठी अंडीपुंज आणि अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात. निमगरव्या आणि गरव्या जातींवर प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नीम तेल ५० मिली, डायक्लोरोवॉस १२ मि.ली. किंवा सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही ३ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| **नारळ** | **वाढीची अवस्था** | • पुढील पाचही दिवस पावसाची उघडीप राहून दिनांक ११ ऑक्टोबर २०२०, रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने पावसाचा अंदाज घेऊन पाच वर्षावरील नारळाच्या प्रति झाडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश असा खताचा दुसरा हप्ता द्यावा. खते नारळाभोवती १.५ ते १.८ मीटर अंतरावर मातीत मिसळून दयावीत व खते दिल्यानंतर माडास पाणी दयावे. वर दिलेली खताची मात्रा पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/५ पट, दुसऱ्या वर्षी २/५ पट, तिसऱ्या वर्षी ३/५ पट आणि चौथ्या वर्षी ४/५ पट द्यावीत. नारळ बागेतील वाळलेल्या झावळ्या गोळा करून नष्ट करून बागेची साफसफाई करावी आणि नंतर खताची मात्रा द्यावी. खते दिल्यानंतर माडास पाणी द्यावे. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • घन लागवड (५ x ५ मी. किंवा ६ x ४ मी.) असलेल्या आंबा बागांमध्ये फांद्या एकमेकांमध्ये गेल्या असल्यास वाढलेल्या फांद्या छाटणी करावी आणि वाळलेल्या फांद्या काढून टाकावे व घन लागवड असलेल्या बागांमधील कलमांची उंची दोन ओळींच्या अंतराच्या ८०% इतकी ठेवावी.<br>• पारंपारिक पध्दतीने लागवड केलेल्या आंबा बागेमध्ये जुन्या अनुत्पादित झाडांची मध्य फांदी छाटणी व इतर मध्यम फांद्यांची विरळणी करावी. यामुळे झाडाला जास्त आणि खोलवर सूर्यप्रकाश उपलब्ध होऊन फळ धारणेत वाढ होईल. |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • वाढत्या तापमानामुळे काजूच्या नवीन येणाऱ्या पालवीवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी नवीन पालवी फुटण्याच्या वेळी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **केळी** | **वाढीची अवस्था** | • पुढील पाचही दिवस पावसाची उघडीप असल्याने नवीन लागवड केलेल्या केळी बागेतील तण व रोगट पाने काढून टाकावीत, तसेच केळीच्या झाडांना योग्य भर द्यावी. |
| **भाजीपाला** | **पेरणी** | • रब्बी हंगामाकरिता भाजीपाला लागवडीसाठी रोपे किटक रोधक नायलॉन जाळी मध्ये लावावे जेणेकरून रस शोषक किडीचा प्रादुर्भाव होणार नाही. |
| **पशुपालन** | | • क्रायमिन कॉंगो हेमोरायजिक फिवर या गोचीडापासून पसरणाऱ्या विषाणूजन्य रोगाची जनावरांना लागण होण्याची शक्यता असल्याने, शेतकऱ्यांनी जनावरांच्या गोठ्यात स्वछता राखावी तसेच गोचीडांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास सायपर मेथरीन किंवा डेलटामेथरिन ही प्रतिबंधक औषधे पशू वैद्यकांचा सल्ला घेवून गोठ्यात व जनावरांवरती फवारावे.<br>• शेतकऱ्यांनी गोचीड हाताने काढून टाकणे किंवा मारणे कटाक्षाने टाळावे. गोठा स्वछ करताना हात मोजे, मास्क तसेच गम बुटाचा वापर करावा. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्यकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल येथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.**